**कि.फौ. खं. क्र. ४२३/२०१७** **गिता वि. संतोष**

**नि.११ खाली**

**<u>अर्जदार तर्फे साक्षिदार क्र.१ गिता संतोष गुप्ता यांचा उलटतपास गैरअर्जदार तर्फे वकील श्री. पुडके यांचेकडून शपथेवर सुरु</u>**

९. माझे शिक्षण १०वी नापास आहे. गैरअर्जदार १०वी पास आहे. मी माझा पुरावा वाचलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद क्र.२ मध्ये लिहीलेला मजकूर गैरअर्जदार यांनी मला काही दिवस चांगले नांदविले हा मजकूर खरा व बरोबर आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदार यांनी मला एक महिना चांगली वागणूक दिली. मी परिच्छेद क्र.२ मधील मारहाणीच्या घटनेबाबत पोलीस ठाण्यात तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार यांनी मला कोणतीही मारहाण केली नाही त्यामुळे मी तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की माझी पहिली प्रसुती भंडारा येथे व्हावी अशी गैरअर्जदार यांची इच्छा होती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या बाळतपणासाठी ८,०००/– रुपयाचे बिल डॉ. शेंभेकर यांना माझ्या माहेरच्या लोकांनी दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की तो खर्च गैरअर्जदार यांनी केला होता.

१०. हे म्हणणे खरे आहे की परिच्छेद क्र.३ मध्ये घटनेची तारीख, वार व वेळ नमुद केलेली नाही. त्या घटनेबाबत मी अगर माझ्या आईने पोलीस तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की तशी घटना घडली नाही म्हणून मी तक्रार केली नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की परिच्छेद क्र.४ मध्ये नमुद घटनेची तक्रार मी पोलीस ठाण्यात दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की तशी घटना घडली नाही म्हणून मी तक्रार केली नाही. माझ्या माहेरी माझी आई राहते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आईची प्रकृती ठिक नसते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या लग्नानंतर देखील माझ्या आईची प्रकृती ठिक नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे माझ्या आईची देखभाल करण्याची जबाबदारी माझी होती. हे म्हणणे खरे नाही की मी आईची काळजी घेण्यासाठी स्वतःहून लग्नानंतर आईकडे जावून राहिले. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार यांनी मला घरी घेवून जाण्यासाठी बरेच प्रयत्न केले होते. साक्षिदार स्वतःहून सांगते की मी राहण्यास गेली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर आईची प्रकृती ठिक नसल्यामुळे मी पुन्हा माहेरी राहण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार यांनी माझ्याविरुध्द नांदण्यास येण्यासाठी भंडारा येथील न्यायालयात हिंदु विवाह अर्ज क्र.५४/२०१२ हा दाखल केला होता. आता मला हिंदु विवाह अर्ज क्र. ५४/२०१२ मधील निकालाची प्रत दाखविली. ती प्रत तीच आहे. त्यास **<u>नि.क्र.२६</u>** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर आदेश झाल्यानंतर देखील मी गैरअर्जदारकडे नांदण्यास गेली नाही. हे मला माहिती नाही की गैरअर्जदार याने भंडारा येथील जिल्हा न्यायालयात अपिल क्र.९५/२०१५ दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की मी स्वतःहून माहेरी राहत असल्यामुळे दिनांक १५.०१.२०१८ रोजी मा. जिल्हा न्यायालयाने घटस्फोट मंजूर केला होता. हे म्हणणे खरे आहे की मी त्या आदेशावर मा. उच्च न्यायालय येथे अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की सदरचे अपील

खारीज झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की कोणतेही कारण नसताना मी स्वतःहून माहेरी राहत आहे त्यामुळे मी पोटगी मिळण्यास पात्र नाही.

१२. माझ्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदार यांनी मला २०१० साली माझ्या माहेरी सोडले आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुतचे प्रकरण हे मी २०१७ साली दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की २०१० ते २०१७ पर्यंत मी स्वतःच्या कमाईवर जगत होते. हे म्हणणे खरे नाही की मी ब्युटीपार्लर व टेलरिंगचा कोर्स केलेला आहे. माझ्या मुलाचे वय सध्या १७ वर्षे आहे. गैरअर्जदार याने एक वेळा माझ्या मुलाच्या शाळेची फी भरलेली आहे. गैरअर्जदार यांचे भाड्यांचे दुकान व रांगोळी व्यवसाय असून त्याला ५०,०००/- इतके उत्पन्न मिळते हे दाखविणारा कोणताही पुरावा मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार हे मजुरी करतात व त्यांना २००/- रुपये प्रति दिन इतकी मजुरी मिळते. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदाराला त्रास देण्यासाठी प्रस्तुतची केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की खोटे शपथपत्र दाखल करून आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष**

SAGAR SHAM JADHAV Digitally signed by SAGAR SHAM JADHAV Date: 2024.06.18 16:49:25 +0530

**ठिकाण –कामठी** **(सागर एस. जाधव)**

**दिनांक – २०/०६/२०२४** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.**